क्र.साप्रवि/रवका/न.क्र.३४८/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १६७ दिनांक १२ / ०८ / २००८

विषय : कर्मचाऱ्यांनी मुख्यालयाच्या ठिकाणी व कार्यालयात वेळेवर उपस्थित रहाण्याबाबत.

संदर्भ : शासनाचे अवर सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२००८/प्रक्र-१२७/ऊर्जा-२, दिनांक १९/०६/२००८.

......

महावितरण कंपनीच्या सर्व कर्मचाऱ्यांनी मुख्यालयी रहाण्याबाबत आणि मुख्यालयी न रहाणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.८६ अनुसार कडक कारवाई करण्याबाबतच्या सुचना प्रशासकीय परिपत्रक क्र.१०६ दि.१०.०५.२००७ अन्वये यापुर्वी देण्यात आल्या आहेत. तथापि, असे निदर्शनास आले आहे की क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे त्यांच्या मुख्यालयी न राहता रोज येणे-जाणे करतात. त्यामुळे अचानक उद्भवणाऱ्या व निर्माण होणाऱ्या घटनेला/अडचणीला ते त्वरित सामोरे जाऊ शकत नाहीत त्यामुळे गोंधळ निर्माण होतो व जनक्षोभ वाढतो. तसेच बरेच अधिकारी/कर्मचारी कार्यालयात वेळेवर उपस्थित रहात नसल्याचेही काही सेवाभावी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून निदर्शनास आले आहे.

२. या संदर्भात राज्याचे मुख्य सचिव यांच्या दिनांक ०९/०५/२००८ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. सदर पत्रान्वये जे अधिकारी/कर्मचारी त्यांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी रहात नाहीत तसेच कार्यालयात वेळेत उपस्थित रहात नाहीत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

३. सर्व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, राज्याचे मुख्य सचिव यांच्या दिनांक ०९/०५/२००८ च्या पत्राचे काटेकारपणे अवलोकन करावे. त्याचप्रमाणे उशिरा येण्याच्या अथवा मुख्यालयी न रहाण्याच्या प्रवृत्तीला आळा बसावा या दृष्टीने संबंधितांवर कडक कारवाई करावी.

४. सदर प्रशासकीय परिपत्रक म.रा.वि.वितरण कं. मर्यादितच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

*( सु. य. पाटील )*
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रत :

१) क्षेत्रिय कार्यालयातील सर्व कार्यकारी अभियंता व त्यावरील दर्जाचे अधिकारी

२) निगम कार्यालयातील सर्व विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख -
- यांना महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार

*E:\O&M\Adm.Circular F.N.348.doc*

मुख्य सचिवांचे कार्यालय
दिनांक : ९.५.२००८

राज्यातील काही सेवाभावी व सामाजिक संघटनांच्या पदाधिका-यांनी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिले आहे की, राज्यातील मंत्रालयीन व **क्षेत्रिय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी** शासकीय कार्यालयात वेळेवर उपस्थित रहात नाही. तसेच बरेच अधिकारी व कर्मचारी त्यांच्या मुख्यालयी न रहाता रोज येणे-जाणे करतात. यामुळे नागरिकांना विनाकारण त्रास सोसावा लागतो.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी याची गंभीर दखल घेतली आहे. तरी याद्वारे सर्व विभागीय सचिवांना कळविण्यात येते की, आपण आपल्या अधिनस्त मंत्रालयीन व क्षेत्रिय कार्यालयांना त्वरित सूचना दयाव्यात व अशात-हेने **उशिरा येणाच्या** अथवा **मुख्यालयी न राहण्याच्या** प्रवृत्तीला आळा बसेल यादृष्टीने कार्यवाही करावी. वरीष्ठ अधिका-यांनी कार्यालयांना अचानक भेटी देणे व उशिरा येणारे व मुख्यालयी न राहणारे अधिकारी व कर्मचारी यांचेबद्दल कडक शिस्तभंगाची कारवाई करणे आवश्यक आहे.

अधिनस्त यंत्रणेला शिस्त लावण्याबरोबरच प्रशासकीय विभागांचे सचिव व इतर वरिष्ठ अधिका-यांनी सुध्दा स्वत: मंत्रालयात वेळेवर उपस्थित राहणे आवश्यक आहे.

याबाबत यापूर्वीही अनेकदा सूचना निर्गमित झालेल्या आहेत. तरी सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल यादृष्टीने सर्व अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती मला अवगत करावी.

(जॉनी जोसेफ)
**मुख्य सचिव**

**सर्व मंत्रालयीन सचिव**

प्रत:-

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

MAY०८DICT